लोकमत


## शिवाजी विद्यापीठाचे ४४२ कोटींचे अंदाजपत्रक : गुणवत्ता शिष्यवृत्तीचा हिस्सा दुपटीने वाढला; नऊ कोटींची तूट

# संशोधनाला चालना; वसतिगृहांसाठी कोटींची तरतूद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शैक्षणिक व संशोधन कार्यास चालना, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी नवीन वसतिगृहांची उभारणी, गुणवत्ता शिष्यवृत्तीतील विद्यापीठाच्या हिश्श्यामध्ये दुपटीने वाढ आणि ऑनलाईन, डिजिटल कामकाजाच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठीचे शिवाजी विद्यापीठाचे ४४२ कोटी २९ लाखांचे २०१९-२० चे वार्षिक अंदाजपत्रक अधिसभेने (सिनेट) शुक्रवारी मंजूर केले.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात ही अधिसभा झाली. देखभाल, विकास, वेतन, संस्था योजना, निलंबन लेखे या विभागात अंदाजपत्रक आहे.



सन २०१८-१९ चे सुधारित आणि २०१९-२० या आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी मांडले. या वर्षीच्या अंदाजपत्रकात ४४२ कोटी २९ लाख ५२ हजार रुपये अपेक्षित जमा आणि अपेक्षित खर्च ४५१ कोटी ३० लाख ८५ हजार रुपये आहे. संबंधित अंदाजपत्रक ९ कोटी १ लाख इतक्या तुटीचे आहे. ही तूट शिलकेतून भरून काढली जाणार आहे.

या अंदाजपत्रकात शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ऑनलाईन बुक्स अँड जर्नल्स खरेदीसाठी ग्रंथालय विभागास २ कोटी ५० लाखांची, नवीन विद्यार्थी वसतिगृह आणि सध्या असलेल्या मेसची दुरुस्ती, दैनंदिन खर्चासाठी ३ कोटी ८४ लाखांची, तर विद्यार्थिनी वसतिगृहासाठी १ कोटी ९४ लाख ३४ हजार रुपयांची तरतूद केली आहे. कमवा व शिका योजनेतील मुलींच्या नव्या वसतिगृहातील सोई-सुविधा, दैनंदिन खर्चासाठी ३३ लाख ९२ हजारांची, तर परदेशी विद्यार्थ्यांकरिता पायाभूत सुविधांसाठी ५२ लाख सात हजारांची तरतूद आहे.

गुणवत्ता शिष्यवृत्तीतील विद्यापीठाचा हिस्सा १० लाखांवरुन २० लाख केला आहे. विद्यापीठाच्या विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय उपचारासाठी २० लाखांची, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुविधांसाठी २ कोटी २५ लाखांची आणि संशोधक विद्यार्थ्यांसाठी ७ लाख ७१ हजारांची तरतूद केली आहे.

**या मुद्द्यांवर सदस्यांचा आक्षेप**

संगणकप्रणाली, सिक्युरिटी अॅडव्हान्सेस, इमारतींचे रंगकाम-देखभाल दुरुस्ती, राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या कार्यक्रमासाठी होणारा खर्च, आदींबाबत अधिसभा सदस्यांनी आक्षेप नोंदवत स्पष्टीकरण मागितले. त्याबाबत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, आदींनी स्पष्टीकरण दिल्यानंतर सभागृहाने अंदाजपत्रक मंजूर केले. या अंदाजपत्रकावर सभागृहात एक तास चर्चा झाली.

### अंदाजपत्रकातील जमा-खर्च

| तपशील | अपेक्षित जमा | अपेक्षित खर्च (कोटींमध्ये) |
|---|---|---|
| देखभाल | ७८,६१,७६,५०० | १०८,५८,९८,५०० |
| विकास | ५५,०५,५०,००० | ५५,०५,५०,००० |
| वेतन | ११९,२५,३५,००० | ११९,६३,६६,००० |
| संस्था योजना | ६,२२,५२,००० | २०,९१,८६,००० |
| निलंबन लेखे | १८३,१४,३८,५०० | १४७,१०,८४,५०० |

### खर्चाच्या इतर तरतुदी

- ६० लाख रिसर्च स्कॉलर होस्टेलसाठी
- ५० लाख नवीन अकॅडमिक कॉम्प्लेक्स
- ५० लाख इनडोअर स्पोर्टस् कॉम्पेलक्साठी
- १५ लाख माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी
- १.४५ कोटी संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी
- १ कोटी (प्रत्येकी) संशोधनाला चालना देण्याकरिता, शास्त्रीय उपकरणे, संगणकांसाठी
- ६८ लाख नवीन सात विभागांसाठी
- ५० लाख (प्रत्येकी) नवीन रेकॉर्ड रुम, बांधकाम भवन बांधण्यासाठी.

सर्व आकडेवारी रुपयांत

# राष्ट्रीय पटलावर पन्हाळा अवकाश संशोधन केंद्र

भगवान शेवडे, वारणानगर

पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रावर इंडियन नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम उपलब्ध असून, याचा उपयोग पीएचडी आणि एमएस्सी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून संशोधनासाठी केला जातो. येथील संशोधनामुळे हे केंद्र राष्ट्रीय पटलावर चर्चेला आले आहे.

डिपार्टमेंट सायन्स टेक्नॉलॉजीसाठी २२.४८ लाखांचा प्रोजेक्टर मिळाला असून येथे असणाऱ्या मॅग्नाटो मीटरद्वारे पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रात होणाऱ्या बदलाचे निरीक्षण केले जाते. पाऊस, तापमान, हवेतील आर्द्रता येथे असणाऱ्या सिस्टीममध्ये सेव्ह केली जाते. येथील रिव्हो मीटर सिस्टीमच्या सहाय्याने आकाशगंगा, कोस्मेटिक किरणे, सूर्यावर वेळोवेळी होणाऱ्या बदलांचे अपडेट रेडिओ

## वातावरणाचा रेडिओ लहरींच्या सहाय्याने अभ्यास

लहरींच्या माध्यमातून संकलित केले जातात. रेडिओ लहरींच्या सहाय्याने पृथ्वीच्या वातावरणाचा अभ्यास, सूर्यमालेतील अवकाशात होणारे बदल यांचा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयोग होत आहे.

पीएचडी, एमएस्सी करणारे विद्यार्थी येथे संगणकावर संकलित झालेला डाय घेऊन विद्यापीठात येऊन त्याच्यावर संशोधन करतात. दिवसभरात संकलित झालेला डाय अपडेट करण्यासाठी विद्यार्थ्यांना दोन दिवस लागतात.




उंच ठिकाण आणि लोकांची वर्दळ नसणारे पन्हाळगड ठिकाण अवकाश संशोधनाच्या दृष्टीने निवडले गेले आहे. येथील सर्व यंत्रसामग्री रेडिओ लहरींवर चालत असल्यामुळे ऊन, वारा, पाऊस, ढगाळ वातावरण यांचा कोणताही परिमाण यंत्रणेवर होत नाही. जागा निवडताना शहरापासून दूर आणि प्रदूषणाचा प्रादुर्भाव होणार नाही अशी निवडावी लागत असल्यामुळे विद्यापीठाने मागणी केल्यानंतर राज्य सरकारने ही जागा दिली आहे. राज्यात पुणे येथे खगोलशास्त्राचे संशोधन करणारे केंद्र आहे आणि त्यानंतरचे पृथ्वीवरच्या आणि सूर्यावरच्या वातावरणाचे संशोधन करणारे केंद्र पन्हाळा येथे आहे. विद्यापीठात दरवर्षी हजारहून अधिक विद्यार्थी या केंद्राच्या माध्यमातून रिसर्चचे काम करतात.

वेळोवेळी होणारे सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, पृथ्वी आणि सूर्यमालेत होणाऱ्या विशेष घटनांवेळी निरीक्षणे करून त्याचा अभ्यास केला जातो. विद्यापीठाला दोन महिन्यांपूर्वी बारा इंची मोठी दुर्बिण मिळाली आहे. अहमदाबाद येथील फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीच्या मदतीने आणखी वेगळ्या पद्धतीचा वापर करून राज्यातील अवकाश संशोधनातील मोठे केंद्र या ठिकाणी विकसित होणार आहे. राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या संशोधन संस्थांबरोबरही करार करण्यात आले आहेत.

“



पन्हाळगडावरील अवकाश संशोधन केंद्र विद्यार्थ्यांसह इतर अभ्यासकांना माहिती मिळणारे आधुनिक केंद्र व्हावे असा आमचा प्रयत्न आहे. राज्य सरकारने केंद्रासाठी एक एकर जागा दिली आहे. पण ती पुरातत्त्व खात्याची असल्याने येथे कायमस्वरूपी बांधकाम न करता येत नाही. सध्या असणाऱ्या पत्र्याच्या इमारतीत आम्ही सर्व यंत्रणा ठेवली आहे. अहमदाबाद येथील फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीच्या मदतीने आणखी वेगळ्या पद्धतीचा वापर करून राज्यातील अवकाश संशोधनातील मोठे केंद्र या ठिकाणी विकसित होणार आहे. राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या संशोधन संस्थांबरोबरही करार केले आहेत.

– डॉ. राजीव व्हटकर, समन्वयक, अवकाश संशोधन केंद्र, पन्हाळा

# ४४२ कोटींचे बजेट मंजूर

## अपेक्षित खर्च ४५१ कोटी; ९ कोटींची तूट शिलकीतून भरून काढणार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या येत्या शैक्षणिक वर्षासाठीचे ४४२.२९ कोटी रूपयांचे अंदाजपत्रक वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार अधिसभेच्या मंजुरीसाठी शुक्रवारी मांडण्यात आले. २०१९ -२० या वर्षासाठी विद्यापीठाचा अपेक्षित खर्च ४५१.३० कोटी आहे. ९ कोटी रूपये तुटीचे अंदाजपत्रक असून ही तूट गतवर्षीच्या शिल्लक रकमेतून भरून काढण्यात येणार असल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. धनाजी कणसे यांनी अंदाजपत्रक मांडले. अधिसभेच्या बैठकीत या तुटीच्या अंदाजपत्रकास एकमताने मंजुरी देण्यात आली.

शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी येत्या वर्षासाठी ऑनलाइन पुस्तके व जर्नल यांच्या खरेदीसाठी ग्रंथालय विभागास २ कोटी ५० लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी वसतिगृहाकरीता ३ कोटी ८४ लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये नवीन वसतिगृह बांधकाम मेसची दुरुस्ती व दैनंदिन खर्चाचा समावेश आहे. विद्यार्थिनी वसतिगृहासाठी एकूण १ कोटी ९४ लाख ३४ हजारांमध्ये मेसची दुरुस्ती व दैनंदिन खर्चाचा समावेश आहे. कमवा व शिका अंतर्गत मुलींचे वसतिगृह नव्याने बांधण्यात आले असून त्यामध्ये सोयीसुविधा व दैनंदिन खर्चासाठी ३३ लाख ९२ हजार रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या २७ परदेशी विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांसाठी

### दृष्टिक्षेपात बजेट

- संशोधनाला चालना देण्यासाठी विशेष आर्थिक तरतूद
- खेळाच्या मैदानावर आर्थिक खर्चाचे नियोजन
- मूलभूत सुविधा अद्ययावत करण्यावर भर
- नूतन अभ्यासक्रमांच्या विकासाला भरीव निधी
- वसतिगृहातील सुविधा व मेस दुरूस्तीला बजेटमध्ये प्राधान्य



**७८ कोटी ६१ लाख**
देखभाल अंदाजपत्रक

**५५ कोटी ५ लाख**
विकास अंदाजपत्रक

**११९ कोटी २५ लाख**
वेतन अंदाजपत्रक

**६ कोटी २२ लाख**
एजन्सी स्कीम

**१८३ कोटी १४ लाख**
निलंबन लेखे

५२ लाख ७ हजार रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. रिसर्च स्कॉलर हॉस्टेल्ससाठी ६० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाच्यावतीने विविध स्पर्धा खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरे, यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचारासाठी दहा लाखांची तरतूद करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठ मेरीट स्कॉलरशिपचा विद्यापीठ हिस्सा दहा लाखांवरून २० लाख करण्यात आला आहे. दिव्यांगांच्या सुविधा निर्माण करण्यासाठी सव्वा दोन कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी एक कोटी ४५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी देखभाल अंदाजपत्रकातून एक कोटी रूपये तसेच शास्त्रीय उपकरणे व संगणक यासाठी एक कोटी रूपयांची तरतूद संशोधन व विकास निधीतून करण्यात आली आहे. विद्यापीठातील सर्व विभागातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी सात लाख ७१ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठातील विविध इमारती तीस ते चाळीस वर्षे जुन्या असल्याने त्यामध्ये आवश्यक त्या दुरुस्तीसह नवीन बांधकामासाठी घसारा निधीतून व संशोधन विकास निधीतून ते तीस कोटी ८८ लाख ५० हजार निधी देण्यात येणार आहे. विद्यापीठ परिसरातील रस्ते सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून दोन कोटी तसेच नवीन रस्ते तयार करण्यासाठी संशोधन व विकास निधीतून दोन कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठातील खेळाची मैदाने सुस्थितीत करण्यासाठी घसारा निधीतून २७ लाख इतकी तरतूद करण्यात आले आहे. खेळांच्या विविध सोयीसुविधा होण्यासाठी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स बांधण्याचा प्रस्ताव असून त्यासाठी अंदाजपत्रकात ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठ परिसर सुरक्षिततेच्या दृष्टीने कंपाउंड बांधण्यात येत असून यावर्षी यासाठी एक कोटीची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठ परिसर सुशोभिकरण करण्यासाठी ७५ लाखांची तरतूद करण्यात आली आहे.

नवीन रेकॉर्ड रूम, बांधकाम भवन रिसर्च डेव्हलपमेंट सेंटर, नवीन अकॅडमी कॉम्प्लेक्स यासाठी प्रत्येकी ५० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी यंदा १५ लाख रुपयांचे अनुदान बजेटमधून देण्यात येणार आहे, तर नियमित इमारत देखभाल दुरुस्ती व रंगकाम यासाठी अंदाजपत्रकात ५ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# ९ कोटी रुपयांचे तुटीचे अंदाजपत्रक

## शिवाजी विद्यापीठ अधिसभा बैठकीत मंजुरी; अपेक्षित खर्च ४५१.३० कोटी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या २०१९-२० चे वार्षिक व २०१८-१९ चे सुधारित अंदाजपत्रक अधिसभा बैठकीत मंजूर करण्यात आले. अंदाजपत्रक विद्यार्थी केंद्रित असून २०१९-२० मध्ये विद्यापीठाची अपेक्षित जमा ४४२.२९ कोटी असून खर्च ४५१.३० कोटी रुपये आहे. अंदाजपत्रक ९.०१ कोटी तुटीचे असून ही तूट शिल्लकेतून भरून काढण्यात येणार आहे.

विद्यापीठ अधिसभा बैठक शुक्रवारी झाली. प्राचार्य डॉ. धनाजी कणसे यांनी अंदाजपत्रकाचे वाचन केले. अंदाजपत्रक देखभाल, विकास, वेतन, एजन्सी स्कीम, निलंबन लेखे, असे पाच विभागांत विभागले आहे. अंदाजपत्रकात शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ऑनलाईन बुक्स व जर्नल्स खरेदीसाठी २ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी वसतिगृहासाठी ३ कोटी ८४ लाख आणि विद्यार्थिनी वसतिगृहासाठी १ कोटी ९४ लाखांची तरतूद करण्यात आली असून यात नवीन वसतिगृह



बांधकाम मेसची दुरुस्ती व दैनंदिन खर्चाचा समावेश आहे.

संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी १ कोटी ४५ लाख, विद्यापीठ अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांकरिता ७ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. नव्याने निर्माण झालेल्या विभागांकरिता ६८ लाख इतकी एकत्रित तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठातील जुन्या इमारती दुरुस्ती व बांधकामासाठी ३३ कोटी, नवीन रस्ते २ कोटी, खेळाच्या मैदानासाठी २७ लाख, इनडोअर खेळाच्या विविध सोयींसाठी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. .

दरम्यान, अधिसभा बैठकीत विविध विषयांवर सखोल चर्चा झाली. अधिसभेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विद्यापीठ अधिनियमानुसार संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्थांच्या तपासणीसाठी गठित समितीत नऊ तज्ज्ञ व्यक्तींचे नामनिर्देशन करण्याच्या ठरावावर चर्चा झाली. 'सुटा'च्या सदस्यांनी काही गोष्टींवर आक्षेप घेत विरोध नोंदविला. विद्यापीठाचे २०१८-१९ चे सुधारित अंदाजपत्रक व २०१९-२० चे वार्षिक अंदाजपत्रक मान्यतेसाठी ठेवण्यात आले. सामंजस्य करार व परीक्षा विभागातील संगणकावर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याचे सदस्यांनी सांगितले.

विद्यार्थी प्रतिनिधी आरती शिंदेने राष्ट्रीय विज्ञान दिनावर खर्च होत नाही. तंत्रज्ञान विभागाच्या हॉस्टेलमध्ये मॅगझिन्सवपेपरयेतनसल्याचेसांगितले. दीड तासाच्या चर्चेनंतर हा ठराव मंजूर करण्यात आला. विद्यापीठाचा २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षातील ५५ वा वार्षिक अहवालाचे संजय जाधव यांनी वाचन केले. चर्चेनंतर हा ठराव मंजूर करण्यात आला. विद्यापीठ संशोधन गुणवत्तेच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील पेटंटसाठी वकील नेमण्याबाबतचा ठरावही मंजूर करण्यात आला.

विद्यापीठात सहकार अध्यासन केंद्र सुरू करण्याबाबतचा पुढाकार विद्यापीठाने घ्यावा, अशा शिफारसीचा केलेला ठराव एम. एल. चौगुले यांनी मागे घेतला. डॉ. प्रताप पाटील यांनी महाराष्ट्र शासन व वारणा समूहातर्फे तात्यासाहेब कोरे सहकार अध्यासन केंद्राची निर्मिती करण्यासंदर्भातील ठराव मांडला. यावर चर्चा होऊन प्रस्ताव कुलगुरूंकडे सादर करावा. तो व्यवस्थापन परिषदेसमोर मांडण्यात यावा, अशी सूचना करण्यात आली.

विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देय नसताना शिक्षकांची वेतनश्रेणी व एम.फिल., पीएच.डी. च्या वेतनवाढी अदा केल्या आहेत. अशा कर्मचाऱ्यांची चौकशी करून वेतनावर झालेला जादा खर्च वसूल करावा, असा ठराव मांडण्यात आला. या प्रश्नावर मतदान घेण्यात आले. २८ विरुध्द ६ अशा बहुमताने हा ठराव फेटाळण्यात आला.

### शिफारसीचा ठराव मंजूर

सेट-नेट, गेट अहर्ताधारक विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयातील विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या पीएच.डी., एम.फिल. प्रवेश परीक्षेमधून सूट देऊन त्यांना त्याच विषयातील एकूण पीएच.डी., एम.फिल.रिक्त जागेत स्वतंत्र जागा देण्याच्या शिफारसीचा ठराव मंजूर करण्यात आला.

### ४८ लाख रुपयांचे अनुदान वाटप

आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांनी २०१२-१३ ते २०१७-१८ या कालावधीकरिता अर्थसहाय्य प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव सादर केले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २२ महाविद्यालयांना विविध शाखांसाठी ३७ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. ११ महाविद्यालयांची २०१८-१९ मधील ४८ लाख रुपयांचे अनुदान वाटप प्रक्रिया सुरू आहे.

# विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून विद्यापीठाचे अंदाजपत्रक

## विकासासाठी ५५ कोटींची तरतूद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवत शिवाजी विद्यापीठाचे २०१९-२० सालीचे अंदाजपत्रक शुक्रवारी सादर करण्यात आले. यामध्ये ४४२.२९ कोटी रुपयांची अपेक्षित जमा, तर ४५१.३० कोटींची अपेक्षित तूट आहे. हे अंदाजपत्रक ९.१ कोटींच्या तुटीचे आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी लागलेल्या आचारसंहितेमुळे विद्यापीठाचे अंदाजपत्रक लांबले होते. हे लांबलेले अंदाजपत्रक शुक्रवारी दुपारी मांडण्यात आले. वित्त व लेखा समिती आणि व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार अंदाजपत्रक अधिसभेसमोर ठेवण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या हिताचे आणि विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. एकूण २५ ठळक मुद्दे असणारे हे अंदाजपत्रक ५ गटांमध्ये विभागण्यात आले आहे.

**वेतन :**

जमा : ११९ कोटी २५ लाख ३५ हजार
खर्च : ११९ कोटी ६३ लाख ६६ हजार

**एजन्सी स्कीम :**

जमा : ६ कोटी २२ लाख ५२ हजार
खर्च : २० कोटी ९१ लाख ८६ हजार

**निलंबन :**

जमा : १८३ कोटी १४ लाख ३८ हजार ५००
खर्च : १४७ कोटी १० लाख ८४ हजार ५००

**एकूण :**

जमा : ४४२ कोटी २९ लाख ५२ हजार
खर्च : ४५१ कोटी ३० लाख ८५ हजार
तूट : ९ कोटी १ लाख ३३ हजार

**अंदाजपत्रकानुसार...**

- संशोधन कार्यासाठी २.५ कोटी
- विद्यार्थी वसतिगृहासाठी ३.८४ कोटी
- विद्यार्थिनींच्या वसतिगृहासाठी १.९४ कोटी
- परदेशी विद्यार्थ्यांना पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी ५२ लाख
- कमवा शिकातून मुलींसाठी बांधण्यात आलेल्या वसतिगृहासाठी ३३.९२ लाख
- गुणवत्ता शिष्यवृत्तीची रक्कम १० वरून २० लाख
- खेळांच्या मैदानासाठी २७ लाख
- इनडोअर गेम्ससाठी ५० लाख

**दृष्टिक्षेपात अंदाजपत्रक**

जमा : ७८ कोटी ६१ लाख ७६ हजार ५००
खर्च : १०८ कोटी ५८ लाख ९८ हजार ५००

**विकासकामे :**

जमा : ५५ कोटी ५ लाख ५० हजार
खर्च : ५५ कोटी ५ लाख ५० हजार

सकाळ

# संशोधनासाठी भरीव तरतूद

## विद्यापीठात रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर उभारणार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाचे २०१९-२० चे आर्थिक अंदाजपत्रक आज अधिसभेत मंजूर करण्यात आले. यंदाचे अंदाजपत्रक ४५१ कोटी ३० लाख ८५ हजारांचे आहे. यात संशोधनासाठी भरीव तरतूद आहे. विद्यापीठात रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर उभारले जाणार असून, त्यासाठी ५० लाखांची तरतूद केली आहे. पदवी, पदव्युत्तर पदविका घेणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांच्या मानधनातही वाढ करण्यात आली. संशोधन करणाऱ्या शिक्षकांसाठी



आणि विद्यार्थ्यांसाठीही विशेष अर्थसहाय्याची तरतूद अंदाजपत्रात आहे.

अधिसभेत प्राचार्य डॉ. धनाजी कणसे यांनी ३१ पानांचे अंदाजपत्रक मांडले. सुमारे तासाभराच्या चर्चेनंतर अंदाजपत्रकाला मान्यता देण्यात आली. यंदा अंदाजपत्रकात संशोधनासाठी भरीव तरतूद आहे. विद्यापीठात रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर उभारले जाणार असून, यासाठी ५० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी देखभाल अंदाजपत्रकातून एक कोटी तसेच शास्त्रीय उपकरणे व संगणक यासाठी एक कोटींची तरतूद संशोधन व विकास निधीतून करण्यात आली आहे. पदवी अभ्यासक्रम शिकणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी अंदाजपत्रकात ३२ लाख ५० हजारांची

पान ९ वर »

सकाळ

# संशोधनासाठी भरीव तरतूद

» पान १ वरून

तरतूद केली आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापकांना संशोधनासाठी दीड कोटींची तरतूद आहे. पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या पूर्णकालीन संशोधकांसाठी सात लाख ७१ हजारांची तरतूद आहे. संशोधक विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारण्यात येणार असून, त्यासाठी ६० लाखांची तरतूद केली आहे. संशोधकांसाठी ऑनलाईन बुक आणि जरनल्ससाठी अडीच कोटींची तरतूद आहे.

विद्यार्थी, विद्यार्थिनी वसतिगृह उभारणी, दुरुस्ती यासाठी पाच कोटी ७८ लाख ३४ हजारांची तरतूद आहे. या अंतर्गत काही नवीन वसतिगृहांची उभारणीही केली जाईल.

विद्यापीठातील खेळाडू, कलाकार विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी १० लाख रुपयांची तरतूद असून, आवश्यकतेनुसार त्याचा वापर केला जाईल. विद्यापीठ कामकाजासाठी, सुरक्षेसाठी नवी संगणक प्रणाली विकसित करण्यात येणार असून, त्यासाठीही अंदाजपत्रकात निधी देण्यात आला आहे.

अंदाजपत्रकाच्या चर्चेच अधिसभा सदस्य पंकज मेहता, आरती शिंदे, एस. जी. कुलकर्णी, मनोज गुजर यांनी सूचना मांडल्या. या वेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदिवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. महेश काकडे, लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

### प्रस्तावित नवीन इमारती

- विद्यार्थी, विद्यार्थिनींचे स्वतंत्र वसतिगृह
- इनडोअर गेम्स कॉम्प्लेक्स
- बांधकाम विभागासाठी स्वतंत्र इमारत
- नव्याने सुरू झालेल्या अधिविभागांसाठी अॅकॅडमिक्स कॉम्प्लेक्स

### अंदाजपत्रक असे

| शीर्षक | अपेक्षित जमा | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| देखभाल अंदाजपत्रक | ७८,६१,७६,५०० | १०८, ५८,९८,५०० |
| विकास अंदाजपत्रक | ५५,०५,५०,००० | ५५,०५,५०,००० |
| वेतन अंदाजपत्रक | ११९,२५,३५,००० | ११९,६३,६६,००० |
| एजन्सी स्कीम | ६,२२,५२,००० | २०,९१,८६,००० |
| निलंबन लेखे | १८३,१४,३८,५०० | १४७,१०,८४,५०० |
| एकूण रुपये | ४४२,२९,५२,००० | ४५१,३०,८५,००० |
| तूट रुपये | | ९,०१,३३,००० |

**अंदाजपत्रकातील तूट शिलकीतून भरून काढण्यात येणार आहे.**

सकाळ

# पर्यावरणपूरक सौरघटावर पेटंटची मोहोर

## डॉ. व्हनाळकर यांचे संशोधन; मौनी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

धनाजी आरडे : सकाळ वृत्तसेवा

गारगोटी, ता. १० : ऊर्जा... एक अशी बाब जी आधुनिक जगासाठी अत्यावश्यक आहे. त्यातही सौरऊर्जा हा सर्वांत स्वस्त व मुबलक प्रमाणात उपलब्ध असणारा ऊर्जास्रोत. तरीही या ऊर्जेचे विद्युत ऊर्जेत रूपांतर किफायतशीर मार्गाने करणे सहज शक्य होत नाही. जगात सौरऊर्जेचे विद्युत ऊर्जेत रूपांतर करण्याच्या दृष्टीने संशोधन होत आहे. जगभरात सिलिकॉनपासून सौरघट तयार होतात, पण सिलिकॉन सौरघट हे महागही आहेत, सोबत ते पर्यावरणपूरक नाहीत. पण,


डॉ. व्हनाळकर


डॉ. जीन किम


डॉ. प्रमोद पाटील

आता यावर पर्यायी व अतिशय उपयुक्त आणि स्वस्त सौरघट तयार होतोय आणि हा सौरघट तयार केलाय गारगोटीच्या मौनी विद्यापीठातील युवा संशोधक डॉ. शरदराव आनंदराव व्हनाळकर, डॉ. प्रमोद शंकरराव पाटील (शिवाजी विद्यापीठ) व डॉ. जीन ह्योक किम (चोन्नाम राष्ट्रीय विद्यापीठ, दक्षिण कोरिया) यांनी.

सिलिकॉन सौरघटाला पर्याय म्हणून अत्यंत स्वस्त व प्रर्यावरणपूरक सौरघट निर्मिती पद्धत शोधली आहे. या संशोधनाचे पेटंट या संशोधकांना प्राप्त झाले. सदर शोध नुकताच भारतीय पेटंट कार्यालयाने प्रसिद्ध केला आहे.

मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालयातील डॉ. शरदराव व्हनाळकर यांनी तांबे, जस्त, टिन व गंधक (CZTS) यांचे नॅनोकण मिश्रणातून सौरघट निर्मितीचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. आजतागायत असे नॅनोकण सौरघट तयार करण्यासाठी जगभरातील संशोधक हायड्रोजन, इथिलीन डायअमाईन आदी अत्यंत विषारी व स्फोटक द्रव पदार्थ वापरत होते. पण, डॉ. व्हनाळकर, डॉ. पाटील व डॉ. किम यांनी नवीन पद्धत शोधली

पान २ वर »

### असा झाला सौरघट तयार

CZTS सौरघट तयार करण्यासाठी प्रथम गंधकयुक्त तांबे, जस्त व टिन यांच्या वेगवेगळ्या भुकटीपासून संयुक्त तांबे-जस्त-टिन-गंधक (CZTS) यांचे नॅनोकण तयार केले. असे नॅनोकण तयार करण्यासाठी जलविद्युत पद्धतीचा उपयोग केला असून, प्रथमच हे पदार्थ पाण्यात विरघळले गेले. १८० डिग्री सेल्सियस तापमानाला सदर पदार्थ २४ तासांसाठी तापविले गेले. प्रक्रियेनंतर तयार नॅनोकणयुक्त पावडर सुवाहक काचेच्या पट्टीवर कोट/कल्हीत केली व शेवटी या सर्वांवर केडमियम-सलफाईड व झिंक-ऑक्साइडचे थर चढवून सौरघट तयार केला गेला. असा सौरघट तयार करणे स्वस्त आहे. या पद्धतीपासून सौरघट तयार करणे किफायतशीर असल्याचा दावा डॉ. व्हनाळकर यांनी केला.

सकाळ

# पर्यावरणपूरक सौरघटावर पेटंटची मोहोर

» पान १ वरून

असून, ज्यात फक्त पाण्याचा द्रव पदार्थ म्हणून उपयोग केला आहे.

हे संशोधन पूर्ण करण्यासाठी या संशोधकांना दोन वर्षांहून जास्त कालावधी लागला. त्यांनी हे संशोधन दक्षिण कोरियातील चोन्नाम राष्ट्रीय विद्यापीठ, अमेरिकेतील आईवा विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ येथे पूर्ण केले आहे. हे संशोधन डॉ. पाटील व डॉ. किम यांच्या मार्गदर्शनखाली पूर्ण करण्यात आले. संशोधन कार्यासाठी त्यांना मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष सतेज पाटील, अध्यक्ष आशिष कोरगावकर व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य मिळाले. डॉ. व्हनाळकर यांनी केलेल्या या उपयुक्त व नव्या संशोधनाला नुकतीच भारतीय पेटंट संस्थेने मान्यता दिली आहे. या शोधामुळे मौनी विद्यापीठाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला.

Kolhapur, Kolhapur-Today
11/05/2019 Page No. 2

11-1 MAY 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे ४४२ कोटींचे अंदाजपत्रक एकमताने मंजूर

## विद्यापीठाच्या अधिसभेत अंदाजपत्रक सादर : वार्षिक अंदाजपत्रकात ४५१.३० कोटीचा अपेक्षित खर्च : वार्षिक अंदाजपत्रक ९.०१ कोटी तुटीचे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत २०१९-२० या आर्थिक वर्षासाठीचे ४४२.२९ कोटींचे असून ४५१.३० कोटींच्या खर्चाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करण्यात आले. हे अंदाजपत्रक ९.०१ कोटी तुटीचे असले तरी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानत, संशोधनाला प्रोत्साहन देणारे आणि विद्यार्थी वसतिगृह, संगणक प्रणाली विकसित करणारे, परदेशी विद्यार्थी संख्या वाढवणारे आहे, अशी माहिती प्रभारी डॉ. धनाजी कणसे यांनी दिली. त्यावर जवळपास १ तासाच्या चर्चेनंतर अधिसभा सदस्यांनी वार्षिक अंदाजपत्रकास एकमताने मंजूरी दिली. अधिसभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.



शैक्षणिक वर्ष २०१९-२०चे अंदाजपत्रक ५ विभागात विभागले आहे. शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ऑनलाईन बुक्स जर्नालिझम खरेदीसाठी ग्रंथालय विभागास २ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी वसतिगृहाकरीता ३ कोटी ८४ लाख रुपयाची तरतूद करण्यात आली. त्यामध्ये नवीन वसतिगृह बांधकाम, मेसची दुरुस्ती व दैनंदिन खर्चाचा समावेश आहे. विद्यार्थिनी वसतिगृहाकरीता १ कोटी ९४ लाख ३४ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये मेसची दुरुस्ती व दैनंदिन खर्चाचा समावेश आहे. कमवा व शिका मुलींचे वसतिगृह नव्याने बांधण्यात आले असून त्यामध्ये सोयीसुविधा व दैनंदिन खर्चासाठी ३३ लाख ९२ हजार रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.

मागील दोन ते तीन वर्षापासून परदेशी विद्यार्थी विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. त्यांच्याकरिता पायाभूत सोयी सुविधांकरिता ५२ लाख ७ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रिसर्च स्कॉलर हॉस्टेलकरिता ६० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या वतीने विविध स्पर्धा, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरे यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचारासाठी १० लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठ मेरीट स्कॉलरशिपचा विद्यापीठ हिस्सा १० लाखांवरुन तो २० लाख करण्यात आला आहे. दिव्यांगांकरिता सुविधा निर्माण करण्यासाठी २०१९-२० मध्ये २ कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी १ कोटी ४५ लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.

संशोधनाला चालना देण्याकरिता देखभाल अंदाजपत्रकातून १ कोटी तसेच शास्त्रीय उपकरणे व संगणकासाठी १ कोटी तरतुद संशोधन व विकास निधीतून करण्यात आली आहे. विद्यापीठातील सर्व विभागातील संशोधक विद्यार्थ्यांकरिता फॅसिलिटीज टू रिसर्च स्टुडंन्टसाठी ७ लाख ७१ हजार रुपयांची तर नव्याने निर्माण झालेल्या विभागांकरिता ६८ लाख ९ हजार इतकी तरतुद करण्यात आली आहे. विद्यापीठातील विविध इमारती तीस ते चाळीस वर्षांच्या जुन्या असल्याने आवश्यक त्या दुरुस्त्या नवीन बांधकामासाठी घसारा निधी व संशोधन व विकास निधीतून ३३ कोटी ८८ लाख ५० हजार तर विद्यापीठ परिसरातील रस्ते सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून २ कोटी तसेच नवीन रस्ते तयार करण्यासाठी संशोधन व विकास निधीतून २ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठातील खेळाची मैदाने सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून २७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. खेळांच्या विविध सोयी उपलब्ध करण्यासाठी इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स बांधण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठ परिसर सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षण भिंत बांधण्यासाठी १ कोटी तर विद्यापीठ परिसर सुशोभिकरण करण्यासाठी ७५ लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. विद्यापीठाकडील रेकॉर्ड ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत असल्याने नवीन रेकॉर्ड रुम बांधण्यासाठी ५० लाख रुपये, बांधकाम विभागासाठी सध्याची जागा अपुरी पडत असल्याने बांधकाम विभागासाठी ५० लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट सेंटर ही नवीन इमारत बांधण्यासाठी ५० लाख रुपयांची तर नवीन अधिविभागासाठी मानव्यशास्त्र इमारत अपुरी पडत असल्याने नवीन अॅकॅडमिक कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी ५० लाखाची तसेच माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी २०१९-२० साठी १५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. नियमित इमारत देखभाल दुरुस्ती व रंगकामाकरिता ५ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.